**मुंबई उपनगरमधील ५ कोळीवाड्यांच्या वाढीव सीमांकनाबाबत व नवीन ३ कोळीवाड्यांबाबत शासनास अहवाल सादर करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**महसूल व वन विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : ई-१८८१७८७/भूमापन**

पहिला मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १६.१०.२०२६

संदर्भ :- शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.संकीर्ण-२०१२/प्र.क्र.२७२/ल-१, दिनांक २० नोव्हेंबर, २०१२

**प्रस्तावना :-**

बृहन्मुंबईतील कोळीवाड्यांच्या सिमांकनाबाबतची कार्यपध्दती व मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यासाठी उपसंचालक भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई यांच्या नियंत्रणाखाली दि.२०.११.२०१२ च्या शासन निर्णयान्वये ६ सदस्यीय समिती गठित करण्यात आली होती. उपसंचालक भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई यांनी कोळीवाड्यांचे प्रत्यक्ष स्थळपाहणी करून शासनास सिमांकनासंदर्भात शिफारशी सादर केल्या होत्या. सदर शिफारशींना मान्यता प्रदान करून कोळीवाड्यांचे प्रत्यक्ष सर्वेक्षण करून सिमांकन पूर्ण करून शासनास अहवाल सादर करण्याबाबत उपसंचालक भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई यांना दि.०१.११.२०१८ च्या पत्राव्दारे सूचना देण्यात आल्या होत्या.

२. उपरोक्त सूचनांच्या अनुषंगाने सहाय्यक आयुक्त, मत्स्य व्यवसाय, मुंबई उपनगर यांनी मुंबई उपनगर जिल्ह्यातील कळविलेल्या एकूण २९ कोळीवाड्यांपैकी २३ कोळीवाडयांचे सर्वेक्षण पूर्ण केले आहे. सर्वेक्षण केलेल्या सदर २३ कोळीवाड्यांपैकी काही क्षेत्र सर्वेक्षणामध्ये समाविष्ट न झाल्याने तसेच, काही कोळीवाडे सर्वेक्षणामध्ये समाविष्ट न झाल्याबाबतची निवेदने लोकप्रतिनिधींकडून प्राप्त झाली होती. त्यास अनुसरून विभागीय आयुक्त, कोकण यांनी शासनास सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने सर्वेक्षणामध्ये कोळीवाड्यांचे वाढीव क्षेत्राचे सीमांकन करणे व सर्वेक्षणामध्ये समाविष्ट न झालेल्या कोळीवाड्यांचे सीमांकन करणे करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. यासंदर्भात शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.:-

**शासन निर्णय :-**

महसूल व वन विभाग, शासन निर्णय, दि.२०.११.२०१२ अन्वये उपसंचालक भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई यांच्या नियंत्रणाखाली गठीत करण्यात आलेल्या समितीने मुंबई शहर व मुंबई उपनगरमधील अन्य कोळीवाड्यांचे सीमांकन करण्याबाबत अवलंबलेल्या कार्यपद्धतीनुसार खालील कोळीवाड्यांच्या अनुषंगाने कार्यवाही करावी.

(१) मुंबई उपनगर जिल्हयातील खारदांडा, जुहू कोळीवाडा, जुहू मोरागांव कोळीवाडा, मढ व वर्सोवा या ५ कोळीवाडयांचे पूर्वी केलेल्या सिमांकनाव्यतिरीक्त वाढीव क्षेत्राचे सीमांकन करणे,

(२) नगर भूमापन अधिकारी, बोरीवली कार्यालयाच्या अधिनस्त दहिसर गांवठाण, कांदरपाडा गांवठाण दहिसर (दहिसर) आणि कांदरपाडा गांवठाण एकसर या ३ नवीन कोळीवाड्यांचे सीमांकन करणे

(३) सदर समितीने आपला स्वयंस्पष्ट अहवाल शिफारशींसह या शासन निर्णयाच्या दिनांकापासून ०३ महिन्यांच्या आत शासनास सादर करावा.

२. समितीचे अध्यक्ष यांना विशेष निमंत्रित म्हणून त्यांना योग्य वाटेल अशा अधिकारी/ सेवानिवृत्त अधिकारी किंवा तज्ञ व्यक्तींना समितीच्या बैठकीसाठी आमंत्रित करण्याचे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६१०१६१६५२२७६६४८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANJAY RAGHUNATH BANKAR

Digitally signed by SANJAY RAGHUNATH BANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT,
2.5.4.20=C8A7D6860FF227FD9E69A02E9CA5DFB2CCB25EDA92D7496299
70F349FC6ED260, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=C5917E56B0DA516AB259D846D516CB0584DCE5E9A2E73C
0A35FA47BAB64E88AA, cn=SANJAY RAGHUNATH BANKAR
Date: 2026.10.16 16:53:16 +05'30'

**(संजय बनकर)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत-**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास, गृहनिर्माण), यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा. उपमुख्यमंत्री (रा.उ.शु., क्रिडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास), यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा. मंत्री (सर्व), महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. मा. राज्यमंत्री (सर्व), महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
८. अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
९. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका.
१०.विभागीय आयुक्त, कोकण विभाग
११.जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे
१२. जिल्हाधिकारी, मुंबई शहर
१३.जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर
१४.संचालक, पर्यावरण व वातारणीय बदल विभाग
१५.सहायक आयुक्त, मत्स्यव्यवसाय विभाग, मुंबई
१६.निवडनस्ती (भूमापन).